# मुंबई विद्यापीठ

No.Enrol/Elg./admission/(2020-21) /131 of 2020

**परिपत्रक :—**

मुंबई विद्यापीठाशी संलग्नित/संचलित सर्व कला, वाणिज्य, विज्ञान महाविद्यालयांचे प्राचार्य, / मान्यताप्राप्त संस्थाचे संचालक, संचालक, उपपरिसर (ठाणे व रत्नागिरी) यांना कळविण्यात येते की, विद्यापीठाने Enrol/Elg./admission/(2020-21)/1817 of 2020 दिनांक २१ जुलै, २०२०, Enrol/Elg./admission/(2020-21)/1822 of 2020 दिनांक ४ ऑगस्ट, २०२० आणि No.Enrol/Elg./admission/(2020-21)/ 1823 of 2020 दिनांक ६ ऑगस्ट, २०२० अन्वये प्रथम वर्ष (First Year) प्रवेश प्रक्रियेबाबत वेळापत्रक (Time Table) जाहीर केले होते, त्यानुसार दिनांक ५ ऑगस्ट, २०२० आणि दिनांक १४ ऑगस्ट, २०२० रोजी सायं. ६.०० वाजता विद्यार्थ्यांची प्रवेश प्रक्रिया नोंदणी लिंक बंद करण्यात आली होती व वेळापत्रकाप्रमाणे दिनांक ६ ऑगस्ट, २०२० रोजी पहिली गुणवत्ता यादी (First Merit List), द्वितीय गुणवत्ता यादी (Second Merit List) दिनांक १० ऑगस्ट, २०२० आणि तृतीय गुणवत्ता यादी (Third Merit List) दिनांक १७ ऑगस्ट, २०२० रोजी जाहीर करण्यात आलेली आहे.

परंतू अद्यापही काही विद्यार्थी www.mum.digitaluniversity.ac या विद्यापीठाच्या संकेतस्थळावर प्रवेश नोंदणी करू शकले नाहीत, त्यामुळे अश्या विद्यार्थ्यांसाठी www.mum.digitaluniversity.ac या संकेतस्थळावरील प्रवेश नोंदणी लिंक दिनांक १८ ऑगस्ट, २०२० रोजी सकाळी ११.०० पासुन प्रवेश नोंदणीसाठी उपलब्ध करून देण्यात येत आहे. सदरची लिंक ही विद्यार्थ्यांना दिनांक २१ ऑगस्ट, २०२० रोजी संध्याकाळी ३.०० वाजेपर्यंत नोंदणी साठी खुली असेल, या लिंक मधुन विद्यार्थ्यी आपली प्रवेश नोंदणी करू शकतील. तसेच महाविद्यालयाच्या प्रवेश नोंदणीची Link दिनांक १८ ऑगस्ट, २०२० सकाळी ११.०० वा. पासुन २१ ऑगस्ट, २०२० सायं. ०५.०० वाजेपर्यंत उपलब्ध करून देण्यात यावी. जे विद्यार्थी दिनांक १८ ऑगस्ट, २०२० पासुन २१ ऑगस्ट, २०२० पर्यंत महाविद्यालयाच्या संकेतस्थळावर प्रवेश नोंदणी करतील अशा विद्यार्थ्यांची महाविद्यालयांनी चतुर्थ गुणवत्ता यादी (Fourth Merit List) तयार करताना सदर विद्याथ्यांचा सामावेश करावा तसेच दिनांक २४ ऑगस्ट, २०२० रोजी सकाळी ११.०० वाजता जाहीर करावी तसेच दिनांक २४ ऑगस्ट, २०२० दुपारी ०१.०० पासुन ते दिनांक २८ ऑगस्ट, २०२० सायं. ०५.०० वाजेपर्यंत प्रवेश प्रक्रिया पुर्ण करावी सदर विद्यार्थ्यांना ज्या महाविद्यालयात प्रवेश घ्यायचा असेल त्या महाविद्यालयाची गुणवत्ता यादी जाहीर झाल्यावर संबधीत महाविद्यालयाच्या संकेतस्थळावर प्रवेशाची पुढील कार्यवाही करावी. ज्या विद्यार्थ्यांनी या आधी महाविद्यालयाच्या संकेतस्थळावर नोंदणी केली होती परंतू प्रवेश घेतले नाहीत अशा विद्यार्थ्यांनी महाविद्यालयाच्या संकेतस्थळावर पुनश्च नोंदणी करावी.

......२/—

चतुर्थ गुणवत्ता यादी (Fourth Merit List) जाहीर झाल्या नंतर जर महाविद्यालयामध्ये जागा शिल्लक राहिल्यास महाविद्यालयांनी आपल्या स्तरावर गुणवत्ता यादी जाहीर करावी व प्रवेश प्रक्रिया राबवावी.

तरी सदरची बाब ही सर्व संबंधीत महाविद्यालयाचे प्राचार्य, विद्यार्थी व प्रवेश प्रक्रियेशी संबधीत सर्वांच्या निदर्शनास आणून दयावी.

ठिकाण : मुंबई – ४०००३२
दिनांक : १७ ऑगस्ट, २०२०

(डॉ. विनोद पाटील)
प्रभारी कुलसचिव

**प्रत माहीती व योग्य त्या कार्यवाहीसाठी –**

मुंबई विद्यापीठाशी संलग्नित/ संचलित सर्व कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालयाचे प्राचार्य व मान्यताप्राप्त संस्थाचे संचालक.

स्वीय सहाय्यक १) कुलगुरू २) प्र–कुलगुरू ३)कुलसविच ४) संचालक, परीक्षा व मुल्यमापन मंडळ.